MHNG030013522026

**फौजदारी किरकोळ अर्ज/१९९/२०२६**
**विमला किसन लूटे ओंकार विजु लूटे वि.. महाराष्ट्र राज्य पुलिस स्टेशन गणेशपेठ**
**मधील नि.क्र.०१ खालील आदेश**

अर्जदार नामे **विमला किसन लुटे तर्फे कुलमुखत्यारधारक नामे ओंकार विजू लुटे** यांनी प्रस्तुतचा अर्ज कलम ५०३ भारतीय नागरीक सुरक्षा संहिता प्रमाणे जप्त मुद्येमाल पुर्ववत ताब्यात मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

१] अर्जदार यांचे थोडक्यात कथन असे आहे की, पो. स्टे. गणेशपेठ यांनी गु.र.नं.५५५/२०२५ भा.न्या.सं. कलम ३०३(२), ३(५) या गुन्हयात जप्त केलेला अर्जदार याचे मालकी व ताब्यातील चोरी गेलेले सामान जे की, सोन्याचे दागिने परत मिळणेकरीता अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे. अर्जदाराचे थोडक्यात कथन असे की, अर्जदाराचे तक्रारीवरुन पोलीसांनी प्रस्तुतचा गुन्हा दाखल केला आहे. प्रस्तुत गुन्हयात जप्त करण्यात आलेल्या मुद्येमालाचा अर्जदार कायदेशीर मालक आहे. सदर जप्त मुद्देमाल हा अर्जदाराच्या मालकीचा असून तो पोलीस स्टेशन मध्ये पडून राहिल्यास त्याचे मूल्य कमी होण्याची शक्यता आहे. सदर दागिने पोलीस स्टेशनला एकाच जागी पडुन राहिली तर अर्जदाराचे अतोनात नुकसान होईल. करीता अर्जदाराने मुद्देमाल परत मिळणेबाबत विनंती केली आहे.

२] सरकारतर्फे सहा. सरकारी अभियोक्या यांनी प्रस्तुत अर्जास म्हणणे नि.क्र.८ वर सादर केले असुन त्यांनी त्यांच्या म्हणण्यामध्ये असे नमुद केले आहे की, अर्जदाराने मुद्देमाल तिच्या मालकीचा असल्याबाबत कोणतीही बिले सादर केली नसल्याने व मुद्देमाल हा पुराव्याचा भाग असल्याने योग्य ते आदेश व्हावे अशी विनंती केली आहे. तपासी अधिकारी यांनी नि. क्र.४ ला त्यांचे म्हणणे सादर केले असुन त्यांनी त्यांचे म्हणण्यामध्ये प्रस्तुतचा मुद्देमाल हा आरोपीच्या बयानावरून जप्त करण्यात आल्याचे कथन केले आहे. न्यायालयाच्या अटी व शर्तीनुसार जप्ती पत्रकाप्रमाणे जप्त मुद्येमालाचा ताबा अर्जदारास देण्याबाबत त्यांना कोणतीही हरकत नसल्याचे कथन त्यांनी केले आहे. प्रस्तुत प्रकरणामध्ये

दोन्ही आरोपींनी त्यांचे म्हणणे नि.क्र.६ वर सादर केले असून त्यांना प्रस्तुतचा मुद्देमाल अर्जदारांना परत करण्यास कोणतीही हरकत नसल्याचे कथन केले आहे.

३] दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला.

४] प्रस्तुत गुन्हयामध्ये अर्जदाराच्या ताब्यामधील दिनांक ३१/१०/२०२५ चे रात्री ०७.३० ते ०८.०० चे दरम्यान मॉडेल मिल चौक ते गणेशपेठ बस स्टॅन्ड, नागपूर चे दरम्यान अज्ञात ऑटो चालकाने व त्याच्या साथीदाराने अर्जदाराने कपडयात ठेवलेले रक्कम रू.२,२७,०००/– चे दागिने व रू.४०,०००/– नगद असे एकूण रू.२,६७,०००/– रकमेचा ऐवज चोरी झाल्याच्या तक्रारीवरून गणेशपेठ पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा र.क्र. ५५५/२०२५ नोंदविण्यात आला. तपासादरम्यान आरोपीच्या जबाबावरून एक सोन्याची पोत १२.२९० ग्रॅम, एक ६.०२० ग्रॅम सोन्याची अंगठी, एक ४.८०० ग्रॅम सोन्याची अंगठी, एक २.२७० ग्रॅम सोन्याची अंगठी, एक १.९९० ग्रॅम सोन्याची नथ व एक ५.०३० ग्रॅम सोन्याच्या कानातल्या बि–या तपासी अधिका–याने आरोपीकडून जप्ती पंचनाम्याद्वारे जप्त झाल्याचे दिसून येते.

५] अर्जदाराने जप्त मुद्देमालाची मालकी सिध्द करण्याकामी अर्जासोबत प्रतिज्ञापत्र दाखल केलेले असुन त्यामध्ये त्यांनी असे कथन केले आहे की, त्यांच्याकडे सदर जप्त मुद्देमालाच्या मालकीबाबत त्यांच्या वेगवेगळया पावत्या असल्याचे त्यांनी कथन करून अभिलेखावर विविध हस्तलिखीत पावत्या सादर केलेल्या असून त्यावरून अर्जदार ही जप्त मुद्देमालाची प्रथमदर्शनी मालक असल्याचे आढळून येते. सद्यस्थितीत अर्जदाराव्यतिरीक्त इतर कोणीही जप्त मुद्देमालाची मागणी केल्याचे दिसून येत नाही तसेच तपासी अधिका–याच्या कथनानुसार जप्त मुद्देमाल हा अर्जदाराचा असल्याबाबत कथन केल्याचे दिसून येते. त्यामुळे सदर मुद्देमाल अर्जदारास प्रस्तुत प्रकरणाचा निकाल होईपर्यंत योग्य त्या अटी शर्तीवर परत करणे न्यायोचित होईल.

६] मा. सर्वोच्च न्यायालय यांनी ***सुंदरभाई अंबालाल देसाई विरुध्द गुजरात शासन ए.आय.आर.२००९ सर्वोच्च न्यायालय पान नं. ३६८*** मध्ये दिलेल्या निवाडयाचे अवलोकन केले असता, जप्त मुद्येमाल पोलीस ठाण्यात जास्त काळ न ठेवता त्यासंदर्भात लवकरात लवकर योग्य ते आदेश करण्याबाबत निर्देशीत केले आहे.

७] सदर मुद्येमालाची मालकी दाखवणारा दुसरा इसम या प्रकरणात हजर झालेला नाही. त्यामुळे सदर मुद्येमाल हा पो.स्टे.ला ठेवुन कोणताही उपयोग होणार नाही.

प्रथम खबरी अहवालाचे अवलोकन केले असता जप्त मुद्येमाल हा अर्जदाराचे ताब्यातून चोरीस गेला असल्याची फिर्याद दिली आहे. वरील सर्व बाबींचा विचार करता सदर मुद्येमाल खालील अटीं व शर्तींवर अर्जदाराच्या अंतरीम ताब्यात देणे उचीत होईल. म्हणुन मी खालील प्रमाणे आदेश पारीत करत आहे.

## आदेश

**१.** अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

**२.** तपासी अधिकारी पो.स्टे. गणेशपेठ, नागपूर यांना आदेशीत करण्यात येते की, त्यांनी गु.र.नं.५५५/२०२५ मधील जप्त मुद्देमाल म्हणजेच एक सोन्याची पोत १२.२९० ग्रॅम, एक ६.०२० ग्रॅम सोन्याची अंगठी, एक ४.८०० ग्रॅम सोन्याची अंगठी, एक २.२७० ग्रॅम सोन्याची अंगठी, एक १.९९० ग्रॅम सोन्याची नथ व एक ५.०३० ग्रॅम सोन्याच्या कानातल्या बि–या. सदर मुद्येमालाचा ताबा **विमला किसन लुटे तर्फे कुलमुखत्यारधारक नामे ओंकार विजू लुटे** यांना रक्कम रू.१,००,०००/– चा लायक जामीन या न्यायालयात सादर केल्यानंतर खालील अटींवर देण्यात यावा.

**(अ)** अर्जदार यांनी जप्त मुद्येमाल तपासकामी ज्या ज्या वेळी गरज भासेल त्या त्या वेळी हजर करावा.

**(ब)** अर्जदार यांनी जप्त मुद्येमालाच्या स्वरुपात गुन्हाचा निकाल लागेपर्यंत बदल करु नये अथवा विक्री किंवा इतर त्रयस्थ इसमास हस्तांतरीत करु नये.

**३.** तपासी अंमलदार यांनी रक्कम रुपये २,००,०००/– (रुपये दोन लाख) चा इंडेम्नीटी बॉन्ड स्वीकारून, न्यायालयाने पुढे पारित केलेल्या जामीन स्वीकारल्यानंतरच्या आदेशाबाबतच्या सुचनेनंतर, जप्त मुद्येमाल अर्जदार यांचे ताब्यात देणेपुर्वी फोटोसहीत सविस्तर पंचनामा पुर्ण करावा.

**(खुल्या न्यायालयात घोषीत केला)**

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by KAUSTUBH NAGESH MARATHE
Date: 2026.03.16 15:49:50 +0530

**नागपूर.**
**दि. १६/०३/२०२६**

**(कौस्तुभ नागेश मराठे)**
**न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, नागपूर.**
**(कोर्ट क्र.१)**